# महाराष्ट्र शासन
# आयुक्त, मृद व जलसंधारण, औरंगाबाद
## जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब अराजपत्रित राज्यस्तरीय पदभरती जाहिरात सन २०१८.

(Short Advertisement)

महाराष्ट्र शासनाने आयुक्त, मृद व जलसंधारण, वाल्मी परिसर, औरंगाबाद यांना नोडल अधिकारी म्हणून प्राधिकृत केलेल्या प्राधिकारानुसार **जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब अराजपत्रित** या संवर्गाची रिक्त पदे विहित शैक्षणिक अर्हता धारण करत असलेल्या पात्र उमेदवारांमधुन भरण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक, महापरिक्षा पोर्टल यांचे मार्फत स्पर्धात्मक परिक्षेसाठी केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाची सुविधा www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच, सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in व मृद व जलसंधारण विभागाच्या https://wcd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच केंद्र शासनाच्या कामगार व रोजगार मंत्रालयाच्या National Carrier Service या पोर्टलवर उपलब्ध आहे.

❖ अर्जाचे व परिक्षेचे वेळापत्रक :-

| अ.क्र | ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परिक्षा शुल्क भरण्याची सुरवात | ऑनलाईन पध्दतीने अर्ज अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १) | दिनांक- 26/12/2018 (रात्री – 22:00 पासून) | दिनांक- 15/01/2019 (रात्री -23:59 पर्यंत) |
| २) | ऑनलाईन परिक्षेचा दिनांक | महा परीक्षा पोर्टल वर स्वंतत्र पणे निर्गमित करण्यात येईल. |
| | टिप :- वरील तारखांमध्ये बदल होण्याची संभावना / शक्यता आहे. | |

पदनाम:- जलसंधारण अधिकारी (स्थापत्य), गट ब (अराजपत्रित ) वेतनश्रेणी :- रु.९३००-३४८०० (ग्रेड वेतन रु.४,३००/-)

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण व टक्केवारी | भरावयाची एकुण पदे | समांतर आरक्षणाचा तपशिल | | | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला ३० टक्के | खेळाडू ५ टक्के | अनाथ खुल्या प्रवर्गात ०१ टक्के | |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १. | अनुसुचित जाती | ३७ | ११ | ०२ | ०० | २४ |
| २. | अनुसुचित जमाती | २० | ०६ | ०१ | ०० | १३ |
| ३. | विमुक्त जाती (अ) | ०८ | ०२ | ०० | ०० | ०६ |
| ४. | भटक्या जाती (ब ) | ०७ | ०२ | ०० | ०० | ०५ |
| ५. | भटक्या जाती (क ) | १० | ०३ | ०१ | ०० | ०६ |
| ६. | भटक्या जाती (ड) | ०६ | ०२ | ०० | ०० | ०४ |
| ७. | विशेष मागास प्रवर्ग | ०६ | ०२ | ०० | ०० | ०४ |
| ८. | इतर मागास वर्ग | ५३ | १६ | ०३ | ०० | ३४ |
| ९. | एसईबीसी वर्ग | ४५ | १४ | ०२ | ०० | २९ |
| १०. | खुला | ९० | २७ | ०५ | ०१ | ५७ |
| | एकुण | २८२ | ८५ | १४ | ०१ | १८२ |

वरील तक्त्यामध्ये नमुद केलेल्या २८२ पदांपैकी एकुण ०८ पदे अपंग प्रवर्गाची आहेत. १) HH (Hearing Handicapped) ०३ Post २) OL (One Leg affected) ०३ Post ३) OA (One Arm affected) ०२ Post.

- **सरळसेवा भरती प्रक्रीया संदर्भातील सविस्तर जाहिरात** www.mahapariksha.gov.in **व मृद व जलसंधारण विभागाच्या** https://wcd.maharashtra.gov.in **या वेबसाईटवर तसेच, केंद्र शासनाच्या कामगार व रोजगार मंत्रालयाच्या** National Carrier Service **या पोर्टलवर उपलब्ध** असून उमेदवारांनी संपूर्ण माहिती काळजीपूर्वक समजून घेऊनच ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करावेत. प्रस्तुत पदांकरिता केवळ उक्त संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने भरलेले अर्ज व परीक्षा शुल्क ग्राहय धरण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे अर्ज स्वीकारण्यात येणार नाहीत. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रीये दरम्यान वेळोवेळी भेट देवून भरती प्रक्रियेच्या माहिती बाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवारांची राहील.

- स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार आयुक्त, मृद व जलसंधारण विभाग, औरंगाबाद यांना राहतील तसेच उपरोक्त एकूण पदे दि.३१/१२/२०१९ पर्यंत भरावयाची असून संदर्भीत पात्र उमेदवाराची निवड यादी जाहीर झाल्यानंतर उमेदवारांना उपलब्ध होणाऱ्या पदावर गुणांनुक्रमानुसार प्रथम नियुक्तीचे आदेश निर्गमीत करण्यास आयुक्त, मृद व जलसंधारण, औरंगाबाद हे संक्षम राहतील. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही. तसेच, दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा शासन विहीत नियमानुसार विचार केला जाईल.

**स्थळप्रत आयुक्त यांनी मंजूर केली आहे.**

जा.क्र.आस्था/१०७३/ पदभरती/सन-२०१८
आयक्त, मृद व जलसंधारण यांचे कार्यालय,
वाल्मी परिसर, औरंगाबाद, पिन नं. ४३१ ००१.

स्वा/-
नोडल अधिकारी तथा,
आयुक्त,
मृद व जलसंधारण, औरंगाबाद

दिनांक :- २४/१२/२०१८

# महाराष्ट्र शासन
# आयुक्त, मृद व जलसंधारण, औरंगाबाद
# जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब अराजपत्रीत राज्यस्तरीय पदभरती जाहिरात
# सन २०१८.

(Detail Advertisement)

महाराष्ट्र शासनाने आयुक्त, मृद व जलसंधारण, वाल्मी परिसर, औरंगाबाद यांना नोडल अधिकारी म्हणून प्राधिकृत केलेल्या प्राधिकारानुसार **जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब अराजपत्रीत** या संवर्गाची रिक्त पदे विहित शैक्षणिक अर्हता धारण करत असलेल्या पात्र उमेदवारांमधुन भरण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक, महापरिक्षा पोर्टल यांचे मार्फत स्पर्धात्मक परिक्षेसाठी केवळ ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाची सुविधा www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच, सदर जाहिरात महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in/ https://wcd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर व केंद्र शासनाच्या कामगार व रोजगार मंत्रालयाच्या National Carrier Service या पोर्टलवर उपलब्ध आहे.

❖ परिक्षेचे वेळापत्रक :-

| अ.क्र | प्रक्रिया | दिनांक |
|---|---|---|
| १. | ऑनलाईन अर्ज व शुल्क भरण्याचा कालावधी | दिनांक-26/12/2018 (रात्री- 22:00 वाजे पासून) ते<br>दिनांक- 15/01/2019(रात्री- 23:59 वाजेपर्यंत) |
| २. | प्रवेशपत्र (Hall Ticket) ऑनलाईन प्रिंट काढून घेणे | महा परीक्षा पोर्टल वर स्वंतत्र पणे निर्गमित करण्यात येईल. |
| ३. | ऑनलाईन परिक्षेचा दिनांक | महा परीक्षा पोर्टल वर स्वंतत्र पणे निर्गमित करण्यात येईल. |

भरती प्रक्रिया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल सूचना वगैरे www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसून या संकेतस्थळावर संपर्क साधण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावायाची आहे.

पदनाम :- जलसंधारण अधिकारी (स्थापत्य), गट ब (अराजपत्रित)

वेतनश्रेणी :- रु.९३००-३४८०० (ग्रेड वेतन रु.४,३००/-) उपलब्ध पदसंख्या (एकूण पदे-२८२)

| अ.क्र. | सामाजिक आरक्षण व टक्केवारी | भरावयाची एकुण पदे | समांतर आरक्षणाचा त शिल | | | सर्वसाधारण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | महिला ३० टक्के | खेळाडू ५ टक्के | अनाथ खुल्या प्रवर्गात ०१ टक्के | |
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १. | अनुसुचित जाती | ३७ | ११ | ०२ | ०० | २४ |
| २. | अनुसुचित जमाती | २० | ०६ | ०१ | ०० | १३ |
| ३. | विमुक्त जाती (अ) | ०८ | ०२ | ०० | ०० | ०६ |
| ४. | भटक्या जाती (ब) | ०७ | ०२ | ०० | ०० | ०५ |
| ५. | भटक्या जाती (क) | १० | ०३ | ०१ | ०० | ०६ |
| ६. | भटक्या जाती (ड) | ०६ | ०२ | ०० | ०० | ०४ |
| ७. | विशेष मागास प्रवर्ग | ०६ | ०२ | ०० | ०० | ०४ |
| ८. | इतर मागास वर्ग | ५३ | १६ | ०३ | ०० | ३४ |
| ९. | एसईबीसी वर्ग | ४५ | १४ | ०२ | ०० | २९ |
| १०. | खुला | ९० | २७ | ०५ | ०१ | ५७ |
| | **एकुण** | **२८२** | **८५** | **१४** | **०१** | **१८२** |
| वरील तक्त्यामध्ये नमुद केलेल्या २८२ पदांपैकी एकुण ०८ पदे अपंग प्रवर्गाची आहेत. १) HH (Hearing Handicapped) ०३ Post २) OL (One Leg affected) ०३ Post ३) OA (One Arm affected) ०२ Post. | | | | | | |

स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण व संवर्गनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार शासन मृद व जलसंधारण विभाग, औरंगाबाद यांना राहतील तसेच उपरोक्त एकूण पदे दि.३१/१२/२०१९ पर्यंत भरावयाची असून संदर्भीत पात्र उमेदवाराची निवड यादी जाहीर झाल्यानंतर उमेदवारांना उपलब्ध होणाऱ्या पदावर गुणांकानूसार प्रथम नियुक्तीचे आदेश निर्गमीत करण्यास आयुक्त, मृद व जलसंधारण, औरंगाबाद हे सक्षम राहतील आणि तो त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही. तसेच, दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्याच राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा शासन विहीत नियमानुसार विचार केला जाईल.

पदभरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारी बाबत आयुक्त, मृद व जलसंधारण, वाल्मी परिसर, औरंगाबाद यांना शासन मृद व जलसंधारण विभाग मंत्रालय, मुंबई यांच्या मान्यतेच्या अधीन राहून अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार राहतील.

उमेदवारांचे अर्ज ऑनलाईन (online) पध्दतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना, शैक्षणिक

प्रमाणपत्रे / कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापी, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपूर्वक संपूर्ण अचूक व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास व भरतीच्या कोठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवाराची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती अर्ज सादर केल्यानंतर बदलता येणार नाही. त्यामुळे ऑनलाईन अर्जाची माहिती उमेदवारांनी काळजीपुर्वक / विचारपुर्वक भरावी. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी, शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

शासन निर्णय क्र.प्रानिमं-१२१४/प्र.क्र.(४३/१४)/१३-अ दिनांक ०५.०६.२०१४ नुसार गट- ब (अराजपत्रित) मधिल कोणत्याही पदासाठी (मौखीक परिक्षा) मुलाखत घेण्यात येणार नसल्याने भरती प्रक्रीयेत पात्र झालेल्या उमेदवारांची ऑनलाईन परिक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्याच आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड केली जाईल व अशा उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधातील मुळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे तपासणी करीता पडताळणी समितीकडे उपलब्ध करून दयावी लागतील अन्यथा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

**' शैक्षणिक पात्रता :-**

खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता जाहिरातीच्या दिनांकास प्रमाणपत्रासहीत पूर्ण धारण करणे आवश्यक आहे

| पदनाम | वय | शैक्षणिक व तांत्रिक अर्हता |
|---|---|---|
| १. | २. | ३. |
| **जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रीत)** | 18 वर्षे ते 38 वर्षे | उमेदवाराने शासनाने मान्यता दिलेली तीन वर्षे कालावधीची स्थापत्य अभियांत्रिकी मधील पदविका (Diploma in Civil Engineering) किंवा तिच्याशी समतुल्य अर्हता यामध्ये मान्यताप्राप्त विद्यापीठाकडून/ महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनामार्फत घेण्यात येणा-या खालील प्रमाणे पदविका (कालावधी- ३ वर्ष )<br>• सिव्हील व रुरल इंजिनिअरिंग मधील पदविका.<br>• सिव्हील इंजिनिअरिंग आणि रुरल कन्स्ट्रक्शन मधील पदविका.<br>• ट्रान्सपोर्टेशन इंजिनिअरिंग मधील पदविका.<br>• कन्स्ट्रक्शन टेक्नॉलॉजी मधील पदविका.<br>**(शासन सा.बां.विभाग राजपत्र कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) सेवाप्रवेश नियम दिनांक ०१ जानेवारी, १९९८)** |

वरील तक्त्यामध्ये नमुद केलेली पात्रता ही शासन सा.बां.विभाग राजपत्र कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) सेवाप्रवेश नियम दिनांक ०१ जानेवारी, १९९८, शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०१५/प्र.क्र.३४४/सेवा-३ दिनांक ०७.०१.२०१६ आणि मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाने

रिट याचिका क्र.५४७३/२०१६, क्र.५५५०/२०१६ आणि क्र.५५८९/२०१६ मध्ये दिनांक १८ जुलै, २०१६ रोजी दिलेल्या निकालानुसार अधोरेखित केलेली आहे.

- वयोमर्यादेतील सवलत :-

वयोमर्यादेकरीता उमेदवाराचे वय हे जाहिरातीच्या दिनांकास (**25/12/2018 रोजी** ) असणारे वय विचारात घेतले जाईल.

१. खुला/सर्वसाधारण प्रवर्ग - ३८ वर्षे. **(शासन सा.प्र.विभाग निर्णय क्र.एसआरव्ही२०१५/प्र.क्र.४०४/कार्या१२ दि.२५ ऑक्टोंबर,२०१६)**

२. मागासवर्गीय उमेदवार :- ४३ वर्षे **(शासन सा.प्र.विभाग निर्णय क्र.एसआरव्ही२०१५/प्र.क्र.४०४/कार्या१२ दि.२५ ऑक्टोंबर,२०१६)**

३. अपंग - ४५ वर्षे.

४. खेळाडू ५ वर्षे सवलत ( खुला प्रवर्ग ३८ + ५, मागासप्रवर्ग ४३)

संगणक अर्हता:-

MS-CIT ची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तथापि शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) विभाग क्र.मातंस २०१२/प्र.क्र.२७७/३९ दि. ४.२.२०१३ मध्ये नमूद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक ८६ प्रमाणपत्रापैकी कोणतेही एक प्रमाणपत्र धारक असावा.

- शासकीय सेवेमध्ये भरती झाल्यास होणारी उपलब्धी :-

| पदनाम | वेतनश्रेणी | वेतन अंदाजित (रु) | पदोन्नतीची संधी |
|---|---|---|---|
| जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) गट-ब (अराजपत्रित) | पी.बी.१ ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४३००/- (सहाव्या वेतन आयोगानुसार) | सुरवातीचे मुळ वेतन ९३००/- + ग्रेड वेतन ४३०० /- = एकुण १३,६००/- + इतर भत्ते | मृद व जलसंधारण विभागाचा शासन निर्णय दि.३१.०५.२०१७ च्या संवर्ग साखळी प्रमाणे. |

❖ **नेमणुकीच्या सर्वसाधारण अटी :-**

१) उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा (डोमिसाईल प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक ) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

२) सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

३) विहित वयोमर्यादेतील शासकीय, निमशासकीय सेवेतील कर्मचाऱ्यांनी त्यांचे अर्ज त्यांचे कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाईन भरावे व अशा परवानगीची प्रत उमेदवारांकडे असणे आवश्यक आहे व त्याबाबची कागदपत्रे छाननीच्या वेळी सादर करावी.

❖ परिक्षेचे स्वरूप :- ऑनलाईन परिक्षा.

| अ.क्र. | विषय | भाषा | प्रश्नसंख्या | गुण |
|---|---|---|---|---|
| १) | स्थापत्य अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम | इंग्रजी | एकुण ७० प्रश्न | १४० (प्रति प्रश्न ०२ गुण) |
| २) | सामान्य ज्ञान - (मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान, बुध्दिमापन चाचणी) | मराठी व इंग्रजी | एकुण ३० प्रश्न | ६० (प्रति प्रश्न ०२ गुण) |
| | एकुण | | एकुण १०० प्रश्न | २०० (प्रति प्रश्न ०२ गुण) |

❖ ऑन लाईन परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरूप व कार्यक्रम :-

१. ऑनलाईन परिक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरूपाची असेल. सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे. बहुपर्यायी प्रश्नांसाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी एकच पर्याय निवडावा. (निगेटिव्ह) नकारात्मक गुणपध्दत (मार्क सिस्टिम) अवलंबिण्यात येईल. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधुन वजा करण्यात येतील. तथापि, चुकीच्या उत्तरामागे गुण वजा करण्याबाबतच्या तरतूदी संदर्भात संबंधित परिक्षेच्या प्रवेशपत्रावरील तरतूदीचे अवलोकन व्हावे.

२. जलसंधारण अधिकारी (स्थापत्य), गट ब अराजपत्रित या पदाची ऑनलाईन परिक्षा पदासंबंधीचे तांत्रिक ज्ञान, इंग्रजी, मराठी, चालू घडामोडी, सामान्य ज्ञान आणि बुध्दीमत्ता चाचणी यावर आधारीत असेल.

❖ अभ्यासक्रम:-

| | अभ्यासक्रम |
|---|---|
| | Section name - Civil Engineering (Diploma Level) |

| | | |
|---|---|---|
| | Building Construction & Materials, Applied Mechanics, Strength of materials, Theory of structures, Concrete Technology, Design of reinforced concrete and steel structures, Construction Planning and Management, Surveying, Estimating, Costing and Valuation, Irrigation Engineering, Hydraulics, Geo-technical Engineering, Transportation & Highway Engineering, Environmental Engineering, Soil & water conservation structures and techniques. | |
| | Note :- Syllabus Depth are Diploma in Civil Engineering Level. | |
| | Section name - General Knowledge | |
| | a) | English - Similar Word, Opposite Word, Common Vocabulary, Sentence Structure, Grammar, Use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage. |
| | b) | **मराठी** - समानार्थी शब्द, विरुध्दार्थी शब्द तसेच सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्यप्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे. |
| | c) | **सामान्य ज्ञान** - चालू घडामोडी (जागतिक तसेच भारतातील), इतिहास विशेषत: महाराष्ट्राचा, महाराष्ट्राचा भुगोल, भारतीय अर्थव्यवस्था, भारतीय राजव्यवस्था तसेच पर्यावरण. |
| | d) | **बुध्दिमापन चाचणी** ( Reasoning Test) - उमेदवार किती लवकर व अचुकपणे विचार करून शकतो हे आजमवण्यासाठी प्रश्न. |

❖ **परिक्षा शुल्क :-**

| अ.क्र. | पदनाम /संवर्ग | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|---|
| | | | |
| १. | जलसंधारण अधिकारी (स्थापत्य), गट ब (अराजपत्रित) | रक्कम रुपये ३००/- | रक्कम रुपये १५०/- |

१) उमेदवार आपापल्या सोईनुसार भरणा करु शकतात. भरणा करण्याकरीता फक्त ऑनलाईन पर्याय उपलब्ध आहेत.

<u>:- उमेदवार क्रेडिट कार्ड / डेबिट कार्ड / भीम युपीआय / इंटरनेट बँकिंग व्दारे.</u>

२) उमेदवाराला वीज पुरवठा किंवा इंटरनेट सेवा खंडीत झाल्यामुळे शुल्क भरणा करता आला नाही तर पुन्हा लॉगिन करून शुल्क भरणा प्रक्रीया पुर्ण करावी.

३) शुल्क भरणा झाल्यावर उमदेवाराला " भरणा यशस्वी" म्हणुन संदेश मिळेल आणि झालेल्या व्यवहाराची सविस्तर माहिती अर्जामध्ये आपोआप अंतर्भुत होईल.

❖ **ऑन लाईन अर्ज भरण्याची कार्यपध्दती व सुचना - अर्जामध्ये खालील टप्पे आहेत -**

**१) नोंदणी २) अर्जावरील माहितीचे पुर्वालोकन ३) ऑनलाईन शुल्क भरणा ४) अर्जाची प्रिंट आऊट**

उमेदवाराला www.mahapariksha.gov.inया संकेतस्थळावर लॉगइन करावे लागेल. उमेदवाराने आपल्याउजव्याबाजूलाअसलेल्या -सूचना॰ या पर्यायावर क्लिक करावे. तिथून उमेदवाराला थेट नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करून यूजर नेम, पासवर्ड आणि इमेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या/तिच्या प्रमाणित इमेल आयडीवर सक्रीयतेची लिंक मिळेल जी त्यांच्या साइनअपशी संबंधित असेल. उमेदवाराने त्याचे/तिचे खाते सक्रीय करण्यासाठी त्याच्या/तिच्या इमेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या लिंकवर क्लिक करावे..( Activation लिंकही २ दिवसांकरिता activate असेल.)उमेदवाराने त्याची/तिची लॉगइनची माहिती गोपनीय ठेवावी. एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजरनेम आणि पासवर्ड वापरून केव्हाही लॉग ऑन होता येईल.

टीप : USERNAME आणि PASSWORDजतनकरण्याचीजबाबदारीउमेदवाराचीअसेल .

उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नोंदविलेला ई-मेल आयडी. व मोबाईल क्रमांक चूकीचा / अपुर्ण तसेच मोबाईल क्रमांक रजिस्टर्ड (DND) असल्यामुळे संपुर्ण भरती प्रक्रिये दरम्यान त्या द्वारे पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश व माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

तसेच, ई-मेल आयडी. व मोबाईल संदेश वहनात येणा-या तांत्रिक अडचणींना आयुक्त, मृद व जलसंधारण, औरंगाबाद हे जबाबदार असणार नाही. सदर संकेतस्थळाला भरती प्रक्रिये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रियेची माहितीबाबत अद्ययावत राहण्याची जबाबदारी उमेदवाराची राहिल.

| अर्ज भरण्याची कार्यपधती आणि सुचना :- | |
|---|---|
| १) | उमेदवाराचे नाव, वडीलांचे, पतीचे नाव, आडनाव, वडिलांचे नाव, आईचे नाव, जन्मदिनांक, भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल. |
| २) | छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती - कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी २०० pixel असलेले छायाचित्र स्कॅन करुन अपलोड करा आणि अर्जामध्ये अपलोड करा. प्रतिमेची उंची ६० पिक्सल आणि रुंदी १४० पिक्सल असावी. प्रतिमेचे आकारमान ३ KB ते ५० KB च्या दरम्यान असावे. (टिप- उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) मागिल ०१ महिना कालावधीच्या आतील असावे.) |
| ३) | पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा. कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गाव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिन कोड इ.सहित माहिती भरावी. |

| | |
|---|---|
| ४) | त्यानंतर उमेदवाराने अतिरिक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाऊन मधून त्याने / तिने आपला जात प्रवर्ग निवडावा. |
| ५) | ज्यांच्याकडे आधार क्रमांक आहे. त्यांनी तत्संबंधी माहिति भरावी, तसेच उमेदवाराने आधार क्रमांक/आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी. समांतर आरक्षण (लागू असल्यास) त्यासंबंधीची माहिती द्यावी लागेल. |
| ६) | तसेच मराठी भाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य,अपंगत्वाचा प्रकार (लागूअसल्यास )यासंबंधीची माहिती द्यावी लागेल . |
| ७) | शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेमध्ये जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे, तरच आपणास त्यापदासाठी अर्ज करता येईल. |
| ८) | एकदा शैक्षणिक तपशिल प्रविष्ट केले की अर्जदार पुढे या बटणावर क्लिक रावे लागेल, त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशील संपादित करण्याची परवानगी दिली जाणार नाही. |
| ९) | आता उमेदवारास पदाची निवड करावी लागेल. (Water Conservation Officer Group-B-Non Gazetted) |
| १०) | त्यानंतर उमेदवारास सर्व पदांसाठी आवश्यक असलेली पात्रते बद्दलची माहिती देऊन ती सेव्ह करणे आवश्यक आहे. |
| ११) | उमेदवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परिक्षा केंद्राकरिता तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो. .उमेदवाराने आपल्या अर्जात उपलब्ध करून देण्यात आलेल्या तीनही पसंती क्रमाच्या यादीतील प्रत्येकी एका पर्यायांची निवड आवश्यक आहे. तीनही पसंती क्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास , उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी केंद्र नेमून देण्यात येईल. |
| १२) | उमेदवाराने सगळया नियम व अटी वाचून मान्यता दर्शविण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे. त्यानंतर ऑनलाईन पद्धतीने (इंटरनेट बँकिंग , क्रेडिटकार्ड /डेबिटकार्ड , भीम UPI ) आवश्यक तो परीक्षा शुल्क भरणा करावा. मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा सबमिट हा पर्याय उपलब्ध होईल. उमेदवाराला त्याचा अर्ज डाऊनलोड किंवा प्रिंट करण्याचा पर्याय असेल. |
| १३) | ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेस मध्यरात्री१२.०० वाजल्यानंतर संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल. |
| १४) | जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉगिन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे हॉल तिकीट, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि |

| | |
|---|---|
| | अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल, कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानले जाईल आणि कोणत्याही प्रकारचे पैसे परतफेड केले जाणार नाहीत. उमेदवाराद्वारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयाबद्दलची योग्य प्रक्रिया जाणून घेण्यासाठी enquiry@mahapariksha.gov.inवर लिहा किंवा टोल फ्री नंबर १८००३०००७७६६ वर कॉल करा.<br>नोंद :-नोंदणी मधील तपशील जसे की वापरकर्ता नाव (USERNAME), ई मेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू, समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण) , पसंतीचे स्थान, जन्मतारीख उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) आणि स्वाक्षरी इत्यादी फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. |
| **अर्जातील माहितीचे पुर्वावलोकन :-** | |
| १) | युजरनेम आणि पासवर्ड वापरुन लॉगइन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहू शकतो. |
| २) | अर्ज प्रिंट करण्यासाठी **"प्रिंट प्रिव्हयू"** या पर्यायावर क्लिक करा.<br>नोंद: उमेदवाराने आपला PDF स्वरुपातील अर्ज, परीक्षा प्रवेशपत्र संपूर्ण भरतीप्रक्रीया पूर्ण होई पर्यंत स्वत: जवळ ठेवावा. |
| **महत्त्वाच्यासूचना:** | |
| | १) उमेदवारास देण्यात आलेले परीक्षा केंद्र कोणत्याही परिस्थितीमध्ये बदलण्यात येणार नाही.<br>२) परीक्षा केंद्र किंवा परीक्षा शहर बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीमध्ये (वैद्यकीय किंवा इतर कारणांसाठी) स्वीकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.<br>३) उमेदवार जे वेगवेगळे विभाग / वेगवेगळ्या पदांसाठी अर्ज करत असतील, अशा उमेदवारांनी सर्व विभाग / पदे यांकरिता सारखी परीक्षा शहरांची निवड करावी . अन्यथा वेगवेगळ्या पदांसाठीच्या परीक्षेसाठी वेगवेगळे परीक्षा केंद्र / शहर मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>४) उमेदवाराने आपल्या अर्जात उपलब्ध करून देण्यात आलेल्या तीनही पसंती क्रमाच्या यादीतील प्रत्येकी एका पर्यायांची निवड करणे आवश्यक आहे. तीनही पसंती क्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी जवळील परीक्षा केंद्र नेमून देण्यात येईल.<br>५) उमेदवाराने एका पदासाठी फक्त एकदाच अर्ज करावा, जर एका उमेदवाराने एका पेक्षा अधिक अर्ज केलेले आहेत असे आढळून आले तर अशा उमेदवारांची उमेदवारी रद्द केली जाईल.<br>६) उमेदवाराने भरणा केलेले परीक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे, इत्यादी अशा कारणांसाठी ) परत केले जाणार नाही. |

**सर्वसाधारण सुचना :- (कार्यपद्धती, अटी व शर्ती)**

१) ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपूर्ण भरुन विहित परिक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परिक्षेची रुपरेषा / वेळापत्रक / परिक्षाकेंद्र / बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या (वेबसाईट) वर उपलब्ध राहील. या संबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सबब सदर संकेतस्थळाला भरतीप्रकीये दरम्यान वेळोवेळ भेट देवून भरती प्रक्रीयेची माहिती / कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्रे डाऊनलोड करून घेणेची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

२) ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे ऑनलाईन परिक्षेस बोलाविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही.

३) उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंराजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालयाकडे) नोंदविले असले तरीही यांनी / तिने या पदाच्या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्रपणे विहित शुल्कासहीत ऑनलाइन अर्ज करणे आवश्यक आहे.

४) निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर (निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी) अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, ऑनलाईन अर्जात दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास शासनाची दिशाभूल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल तसेच, एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवंलब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल व नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येवून त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५) उमेदवारास ऑनलाईन परिक्षा व कागदपत्रे पडताळणीकरीता तसेच व्यावसायीक चाचणी इत्यादी करिता स्वखर्चाने यावे लागेल.

६) उमेदवारांना त्यांचे गुण वैयक्तिकरित्या पडताळणी करण्याकरिता प्रश्नांची उत्तरतालिका परिक्षा झालेल्या दिवसापासून साधारणपणे आठवडयाभराच्या कालावधीमध्ये उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

७) ऑनलाईन परिक्षेचे ठिकाण, वेळ, दिनांक उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. परिक्षेचे प्रवेश पत्र उक्त संकेतस्थळावरुन स्वत: डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची असेल. प्रवेशपत्र इतर कोणत्याही पध्दतीने उमेदवारास पाठविले जाणार नाही.

८) उमेदवाराची ऑनलाईन परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या माहितीच्या आधारे गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पूर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पूर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. ऑनलाईन परिक्षेच्या प्राथमिक गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरिम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून वगळण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे

संपूर्ण अधिकार आयुक्त, मृद व जलसंधारण, वाल्मी परिसर, औरंगाबाद यांच्याकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

- **अंतिम निवड** :-

पात्र उमेदवारांचा अंतरिम तसेच अंतिम निकाल वरील संकेतस्थळावर जाहीर करण्यात येईल.

अ) उमेदवाराची अंतिम निवड हि ऑनलाईन परिक्षेत मिळालेल्या एकूण गुणांच्या आधारे केली जाईल.

ब) एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक प्रानिमं/२१५/(प्र.क्र.५५)१५)१३-अ मंत्रालय मुंबई दिनांक ०५ ऑक्टोंबर २०१५ मध्ये नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे निवडयादी केली जाईल.

- **विशेष सूचना** :-

१. जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) या संवर्गातील अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना मृद व जलसंधारण विभागाचे सेवाप्रवेश नियम व सेवा शर्ती लागू रहातील.

२. शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही २०१५/ प्र.क्र.१५६/ कार्या.१२, दि.२८.०४.२०१५, शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही २०१५/ प्र.क्र.१५६/ कार्या.१२, दि.१६.०७.२०१५ व शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही २०१५/ प्र.क्र.१५६/ कार्या.१२, दि.१५.०६.२०१७ “महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदांवर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसुली विभाग वाटप नियम, २०१५” मधील तरतूदींनुसार अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. तसेच जलसंधारण अधिकारी (स्थापत्य) या संवर्गातील अभियंत्यांच्या बदल्या महाराष्ट्रात कोठेही करण्यात येतील.

३. महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या अधिसुचना, शासन निर्णय, परिपत्रके व शुध्दीपत्रकांमधील तरतुदी उमेदवारांस बंधनकारक राहतील.

४. शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदली करीता महाराष्ट्र बदली अधिनियम-२००५ मध्ये नमुद करण्यात आलेल्या तरतुदींच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल. विनियम व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.२०१०/१०/१२ दिनांक ०३/०६/२०११ मधील निर्देशानुसार अन्यत्र बदलीच्या तरतूदी लागू

राहतील.

५. शासन वित्त विभाग निर्णय क्र.अनियो/१०/०५/१२६/सेवा-४ दिनांक ३१.१०.२००५ नुसार दिनांक ०१.११.२००५ रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवाराचा नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे म.ना.से.(निवृत्तीवेतन) नियम १९८२ व म.ना.से.(निवृत्ती वेतनाचे अंशराशिकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

६. शासन सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र.एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२ दिनांक २८.०३.२००५ व शासन परिपत्रक एसआरव्ही-२०००/ प्र.क्र.१७ / २००० / १२ दिनांक ०१.०७.२००५ मध्ये विहित केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये शासनाने गट अ,ब,क व ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापत्र नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहित नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र आवश्यक आहे.

७. शासकीय सेवेमध्ये नियुक्त झाल्यानंतर संबंधित उमेदवारांने सहा महिन्याच्या आत वैद्यकीय दृष्टया सक्षम असल्याचे जिल्हा शासकीय रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्याकडून शासकीय सेवेत काम करण्यास पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र नियुक्ती झालेल्या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

८. शासकीय सेवेमध्ये नियुक्त झाल्यानंतर संबंधित उमेदवारांची नेमणुक त्याचे पुर्वचरित्र व वर्तवणूक (पोलीस एन्कॉएरी) यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील व तसा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांना सेवेतुन काढून टाकण्यात येईल.

९. **मागासवर्गीय आरक्षण :-** विमुक्त जाती अ, भटक्या जमाती ब, भटक्या जमाती क., भटक्या जमाती ड., इतर मागास प्रवर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) आणि विशेष मागास प्रवर्गा मधील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे सन २०१७ -- १८ चे मूळ नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Non Crimilayer Certificate) तसेच जात प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे, अशा उमेदवारांस त्यांच्या जात प्रमाणपत्र वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल.

नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आतमध्ये आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबंधित जात पडताळणी समितीकडून करून घेणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची निवड जात प्रमाणपत्र अभावी रद्द करण्यात येईल.

१०. **महिलांसाठी आरक्षण :-** महिला व बालकल्याण विभाग शासन निर्णय, क्रमांक ८२/२००१, म.से.आ,२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५/५/२००१ मधील तरतुदीनुसार महिलांचे आरक्षण दर्शविण्यात आलेले असून त्यामध्ये निर्देशित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. खुला आणि मागास प्रवर्गातील उमेदवारांनी महिलांसाठीच्या राखीव पदाकरीता अर्ज करतांना उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे सन २०१७ -- १८ चे मूळ नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (Non Crimilayer Certificate) तसेच प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत कागदपत्र पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल. महिला आरक्षणाच्या लाभार्थी उमेदवारांच्या प्रमाणपत्राची फेरतापसणी आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे मार्फत करणे आवश्यक राहील.

११. **खेळांडूसाठी आरक्षण :-** खेळाडूंसाठी असलेले समांतर आरक्षण, शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.राक्रिधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दि.१ जुलै २०१६ मधील व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार राहील, त्यांचेकरीता उच्च वयोमर्यादा कमाल ५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील, तथापि वयोमर्यादेत ५ वर्षासाठी वयाची अट शिथिल करतांना कोणत्याही प्रवर्गाच्या उमेदवारांची उच्चतम वयोमर्यादा ४३ वर्ष राहिल. विभागीय उपसंचालक, क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडील प्रमाणपत्र निवडीनंतर नियुक्तीचे आदेश देण्यात येतील.

१२. **अनाथ आरक्षण :-** शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्र.अमुजा-२०११/ प्र.क्र २१२/का-३, दिनांक २/४/२०१८ मधील तरतुदीनुसार, अनाथ मुलांसाठी असलेल्या राखीव पदासाठी अर्ज करतांना उमेदवाराकडे, महिला व बाल विकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र उमेदवाराने कागदपत्र पडताळणीचे वेळी पडताळणी समितीस उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. अनाथ आरक्षण प्रमाणपत्राच्या अनुषंगाने एखादया उमेदवाराची नोकरीमध्ये नियुक्ती झाल्यास त्यांने / तिने सादर केलेल्या अनाथ प्रमाणपत्राची फेरतापसणी आयुक्त महिला व बालविकास, पुणे यांचे मार्फत करणे आवश्यक राहील.

१३. **शासकीय व निमशासकीय कर्मचारी :-** यांना वयोमर्यादेत कोणत्याही प्रकारची सूट दिलेली नाही. सदरील पद भरतीकरीता घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेमध्ये अर्ज करावयाचे असल्यास तो त्यांचे कार्यालय प्रमुखाच्या

परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत भरणे आवश्यक राहिल. परवानगीची प्रत, कागदपत्रे छाननीच्यावेळी सादर करावी. अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

१४. **समानगुण आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याचे पाल्य :-** शासन सामान्य प्रशासन विभाग, पूरकपत्र क्र. प्रानिमं-२०१७/ (प्र.क्र.९२/१७) / १३-अ, दिनांक ०५/१०/२०१५ मधील तरतुदींनुसार, लेखी परिक्षेमध्ये समान गुण मिळालेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीत सामावेश करताना त्यामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या पाल्यांस प्रथम प्राधान्यक्रम देण्याच्या शासनाच्या धोरणानुसार अशा उमेवारांकडे अर्ज करतेवेळी, संबंधित जिल्हास्तरीत समितीने त्यास " कुटुंबातील मृत शेतकाऱ्याचा पाल्य" म्हणून पात्र ठरविल्याबाबतच्या पत्राचा क्रमांक व दिनांक असणे आवश्यक राहील. सदरहु मूळ पत्र उमेदवाराने कागदपत्र पडताळणीचे वेळी पडताळणी समितीस उपलब्ध करून देणे आवश्यक राहील.

१५. **अपंग (विकलांग) :-** शासन सार्वजनिक बांधकाम विभाग निर्णय क्र.अपंग २०१०/प्र.क्र.३७५/सेवा-४ दिनांक ११ जानेवारी, २०११ नुसार सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत गट "अ" ते गट "ड" मधील पदांवर सरळसेवेने अपंगांच्या नियुक्तीसाठी निश्चित केलेल्या पदांची यादी निर्देशित केलेली असुन त्यानुषंगाने सदरील पदभरती करण्यात येते आहे.

तसेच, विकलांग प्रवर्गातील उमेदवाराचे विकलांगतेचे प्रमाण किमान ४० टक्के असणे आवश्यक असून शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक अप्रवि २०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६ दिनांक ०६/१०/२०१२ मधील आदेशानुसार विहित नमुन्यातील प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**"लेखनिक (Scribe) ची मदत घेणा-या उमेदवारांसाठी सूचना:**

१) अर्जदाराला लेखनिकाची आवश्यकता असल्यास तशी विनंती आपल्याला अर्जामध्ये करावी लागेल.

२) उमेदवारास लेखनिकाची सोय स्वत: करावी लागेल.

३) उमेदवाराने अर्जामध्ये विनंती केली असल्यास प्रवेश पत्रासोबत (हॉल तिकीट) उमेदवारास लेखनिक घोषणापत्र (scribe declaration form) मिळेल. उमेदवारास लेखनिक घोषणापत्र राजपत्रित अधिका-याकडून ते प्रमाणित करून परीक्षेला आणावे लागेल.

४) लेखनिकाची मदत घेणा-या उमेदवारास नियमानुसार प्रत्येक तासाला २० मिनिटाचा जादाचा कालावधी दिला जाईल."

१६. पदभरतीच्या अधिसुचना, शासन निर्णय व परिपत्रके आवश्यकतेनुसार महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळवरून उमेदवाराने स्वत: उपलब्ध करून घ्यावीत.